# प्रेस नोट

ला.प्र.वि,वाशिम.

दि.२५/०७/२०२५

ईलोसे १)मयुर अंबरलाल हुमने, वय–३४ वर्षे, व्यवसाय–पालक तांत्रिक अधिकारी (च्ज्ञ),पंचायत समिती कार्यालय वाशिम, रा.व्यंकटेश सोसायटी,रिसोड रोड लाखाळा वाशिम. ईलोसे २)ऋषीकेश उत्तम उगले,वय २७ वर्षे व्यवसाय– ग्रामरोजगार सहायक, काजळंबा. रा. काजळंबा ता.जि.वाशिम यांना लाच स्विकारले प्रकरणात ताब्यात घेउन गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरु आहे.

| | |
|---|---|
| आरोपी नांव हुद्दा व पत्ता | ईलोसे १) मयुर अंबरलाल हुमने, वय–३४ वर्षे, व्यवसाय–पालक तांत्रिक अधिकारी (PTO),पंचायत समिती कार्यालय वाशिम, रा.व्यंकटेश सोसायटी,रिसोड रोड लाखाळा वाशिम. ईलोसे २) ऋषीकेश उत्तम उगले,वय २७ वर्षे व्यवसाय– ग्रामरोजगार सहायक, काजळंबा. रा. काजळंबा ता.जि.वाशिम |
| लाच स्विकारल्याची रक्कम | १५००/– रुपये |
| लाच मागण्याचा हेतु | तक्रारदार यांचे वडीलांच्या नावे मंजुर असलेल्या विहीर पुर्ण झाल्याचे प्रमाणपत्र देण्याकरीता १५००/– रुपये लाचेची मागणी करुन स्विकारले आहे. |
| सापळा अधिकारी | ए.एम.गायकवाड, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,वाशिम. |

दि.२१/०७/२०२५ रोजी तक्रारदार पुरुष वय ३१ वर्ष यांनी तक्रार दिली की, तक्रारदार यांचे वडीलांच्या नावे मंजुर असलेल्या विहीर पुर्ण झाल्याचे प्रमाणपत्र देण्याकरीता म्हणुन ईलोसे मयुर अंबरलाल हुमने, पालक तांत्रिक अधिकारी (च्ज्ञ) हे १५००/– रुपये लाचेची मागणी करत आहेत.

दि.२२/०७/२०२५ रोजी पडताळणी कारवाई दरम्यान तक्रारदार यांना १५००/– रुपयाची लाचेची मागणी करुन स्विकारण्याची तयारी दर्शविल्याचे निष्पन्न झाले.

दि.२५/०७/२०२५ रोजी सापळा कारवाई दरम्यान ईलोसे मयुर अंबरलाल हुमने, पालक तांत्रिक अधिकारी (PTO) यांनी तक्रारदार यांना सांगीतले की, १५००/– रुपये लाच रक्कम ही ईलोसे २) ऋषीकेश उत्तम उगले, ग्रामरोजगार सहायक, काजळंबा.ता.जि.वाशिम यांचे कडे द्यावी. त्यामुळे तक्रारदार यांनी १५००/– रुपये लाच रक्कम ही ऋषीकेश उत्तम उगले, ग्रामरोजगार सहायक यांचे जवळ दिली व ती त्यांनी स्विकारल्याने आरोपी कडुन लाच रक्कम १५००/–रुपये हस्तगत केली. दोन्ही आरोपी विरुध्द सदर प्रकरणी भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनीयम १९८८ चे कलम ७,१२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे.

सदर कार्यवाही मा.पोलीस अधिक्षक,श्री मारुती जगताप, अपर पोलीस अधिक्षक श्री सचिंद्र शिंदे, ला.प्र.वि. अमरावती, यांचे मार्गदर्शनात व पर्यवेक्षण अधिकारी पोलीस उप अधिक्षक श्री जगदीश परदेशी ,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,वाशिम यांचे सह तपास अधिकारी पोलीस निरीक्षक ए.एम.गायकवाड यांचे पथकातील कर्मचारी पोहवा राहुल व्यवहारे,योगेश खोटे,विनोद अवगळे,रविंद्र घरत ला.प्र.वि.वाशिम यांनी केली.

शासकिय लोकसेवकाने,खाजगी इसमाने शासकिय काम करुन देण्यासाठी व करण्यासाठी लाचेची मागणी केल्यास त्याबाबत अॅन्टी करप्शन ब्युरो,वाशिम दुरध्वनी क्रमांक ०७२५२/२३५९३३ टोल फ्रि.नं.१०६४ मोबाईल क्रमांक –८४४६८७८९०३ यावर संपर्क साधण्याचे आवाहन ए.एम.गायकवाड पोलीस निरीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो,वाशिम यांनी केले आहे.

(ए.एम.गायकवाड)
पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि.,वाशिम.